तरुण भारत
शनिवार १२ मार्च २०२२

# दोडामार्ग महाविद्यालय प्राचार्यपदी डॉ. सावंत



**दोडामार्ग : नूतन प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांचे अभिनंदन करताना प्रभारी प्राचार्य डॉ. एस. यू. दरेकर. सोबत अन्य.**

वार्ताहर
दोडामार्ग

येथील लक्ष्मीबाई सीताराम हळवे महाविद्यालयाचे प्राचार्यपद मागील दोन वर्षांपासून रिक्त होते. या पदावर कणकवली तालुक्यातील भिरवंडे येथील डॉ. सुभाष सावंत यांची पूर्णवेळ नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी नुकताच पदभार स्वीकारला. यापूर्वी ते मंडणगड येथील महाविद्यालयात प्रभारी प्राचार्यपदी कार्यरत होते. विद्यार्थी आणि महाविद्यालयाच्या विकासासाठी अथक परिश्रम करणारे प्राचार्य म्हणून त्यांची ख्याती आहे. शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात सुद्धा त्यांचे योगदान आहे. संस्थेचे अध्यक्ष अभिजीत हेगशेट्ये व सर्व पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.